1



**CURRENT GLOBAL REVIEWER**

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020 Special Issue – 28, Vol. 2**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
*Guide*
**Dr. B. G. Gaikwad**
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Dr Dr. Balasaheb S. Kshirsagar**
Director, Gandhian Studies Centre
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Dhale S.U.**
Dept. of Political Science,
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Hurgule N.R.**
Dept. of Sociology,
Shivaji College, Hingoli (MS)

**Shaurya Publication, Latur**

T. C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



Scanned with CamScanner

132

SHIVAJI COLLEGE HINGOLI

सुनिल रामदास छडसे

17. म. गांधीची शिक्षण पद्धती नई तालीम 42

प्रा.डो. भालेराव जी.पी.

18. राष्ट्रउभारणीसाठी महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना 44
प्रा.डॉ.प्रशांत प्रभाकरराव सराफ

19. महात्मा गांधी तंटामुक्ती मोहिम : एक अभ्यास 46
प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम

20. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास 49
डॉ. चाटे अपर्णा पांडुरंग

21. महात्मा गांधीजीचे विचार-एक अभ्यास 51

प्रा.सी.एन.पुरी

22. गांधीजींची अस्पृश्यता निवारणासंबंधीची भूमिका 54
प्रा.डॉ.शंकर गडमवार

23. महात्मा गांधीजी पंचायतराज विषयक विचार 57
प्रा. डॉ.जी.एस.पीसे , संदिप शिवाजी शिंदे

24. महिला सबलीकरणात म. गांधीजीचे योगदान 60
डॉ. बने रेखा रामनाथ

25. महात्मा गांधी यांचे शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय विचार 62

संदिप भिमराव कुन्हाडे

26. महात्मा गांधीची ग्रामस्वराज्याची संकल्पना 65
फकिरा भगवान गजभिये

27. मजबुती का नाम महात्मा गांधी 69

डॉ. वायमासे शिवाजी विठ्ठलराव

28. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास 70

डॉ. विलास आघाव , चौधरी संदीप जनार्दन

29. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास 74
प्रा.डॉ.योगेश जगन्नाथ कोरडे.

30. शेतकरी चळवळीत गांधीजींचे योगदान 77

डॉ. किशन केंद्रे

31. महात्मा गांधी : सत्याग्रह चळवळ आणि स्वातंत्र्य एक दृष्टीक्षेप 80
डॉ. पवार आर.के.

32. "महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास" 83

डॉ. कावळे उमराव विठ्ठलराव

33. महात्मा गांधीच्या व्यक्तीमत्वातील विविध पैलुंचा अभ्यास – एक वर्तमान कालीन प्रासंगिकता 85

प्रा. डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे

6

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



Scanned with CamScanner

133

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 28, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# महात्मा गांधीच्या व्यक्तीमत्वातील विविध पैलुंचा अभ्यास – एक वर्तमान कालीन प्रासंगिकता

**प्रा. डॉ. गुणाजी पांडूरंग नलगे**

संचालक क्रीडा विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

SHIVAJI COLLEGE HINGOLI

**गोषवारा :-**

महात्मा गांधी यांना जन्मुन 150 वर्षे होवुन गेली. गांधीजीवर अनेक पुस्तके लिहिली. त्यात गांधीजी केवळ भारतीय स्वातंत्र्य लढयाचेच नेते नव्हते. तर ते संपुर्ण जगात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करणारे नेते होते. त्यासाठी त्यांनी निशस्त्र माणसांना संघटित होण्याचा मार्ग दाखविला. ते एक दृष्टे महापुरुष होते. सामान्य माणुस शस्त्र घेवुन लढू शकत नाही. मात्र त्याची सहनशक्ती मोठी असते. महात्मा गांधींनी या सहनशक्तीचे संघटन करुन त्यातुन अहिंसा व सत्याग्रह या दोन नव्या व अभिनव शस्त्रांची निर्मिती केली. हे शस्त्र एवढे प्रभावी व शक्तीशाली होते की, ज्या साम्राज्यावरुन सुर्य कधी मावळत नव्हता. ते ब्रिटीश साम्राज्य पराभुत झाले. परिणामी एकटा भारतच स्वतंत्र झाला नाही. तर ब्रम्हदेश, दक्षिण आशिया व आफ्रिकेतील अनेक देश, श्रीलंका स्वतंत्र झाले. गांधीजींच्या प्रेरणेमुळेच नेल्सन मंडेला प्रभावित झाले. आणि स्वकीयांची सत्ता आनली. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारताच्या संसदेत भाषण करतांना म्हणाले 'तुमच्या देशात महात्मा गांधी जन्माला आले नसते तर मी अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष कधी झालो नसतो.' आईनस्टाईन म्हणतात – गांधी नावाचा हाडामांसाचा माणुस कधी काळी या पृथ्वीतलावर आपली पावले उमटुन गेला. यावर उदयाच्या पिढया कदाचीत विश्वास ठेवणार नाहीत. त्यांच्या लढयाने समाज बदलले, लोकांच्या वृत्तीत बदल झाला. स्वत: पुरता विचार करणारी माणसे देश आणि समाजाचा विचार करुन त्यांच्या विकासात सहभागी होवू लागली. गांधीजी केवळ स्वातंत्र्य लढयाचे नेते नव्हते तर दलितांच्या उध्दाराचे, स्त्रियांच्या सबलीकरणाचे, सफाई कामगारांच्या कल्याणाचे, हिंदू-मुस्लीम एक्याचे, राष्ट्रीय एकात्मतेचे व सर्व जगात मनुष्य धर्माचा स्विकार व्हावा, ऐक्य व्हावे. यासाठी ते सर्व जगाचे नेते होते. आज जग विनाशाच्या उंबरठयावर येवुन ठेपले आहे. सर्वत्र अनुशक्तीचा हाहाकार, विस्फोटक वृत्ती, युध्द सदृश्य परिस्थिती, जगभरात असलेल्या हुकुमशाही, साम्राज्यवाद, युध्दे संपावित यासाठी तसेच माणसा-माणसातील उच्चनिच्च भाव जावा, जातीभेद नष्ट व्हावा, मानसा-माणसात संवाद, सुसंवाद वाढावा, हा त्यांचा ध्यास होता. सर्वधर्म समान आहेत असे ते म्हणत असत. ' ईश्वर अल्ला तेरो नाम, सबको सन्मती दे भगवान' माणुस हा मुक्त असावा त्याने होणत्याही धर्मांच्या, विचारांच्या मध्ये पडू नये असे त्यांना वाटे. त्यामुळे धर्मांध, जात्यांध विचारांच्या लोकांचा त्यांच्यावर रोष होता. त्यातुनच त्यांची हत्या झाली. मात्र त्यामुळे गांधी देहाणे संपले. पण त्यांचे विचार अमर झाले. गांधी जगाचे झाले, अहिंसा साऱ्या जगाने घेतली. गांधीजींच्या मारेकऱ्यांचे वारसदार जगात आणि भारतात अजुन वावरतात. समतावादी, पुरोगामी व आधुनिक विचारांच्या हत्या अजुन थांबलेल्या नाहीत. जगात स्वातंत्र्य प्रत्येकाला पाहिजे. पण शस्त्रांचा वापर करुन जगातील स्वातंत्र्य लढे रक्तरंजित झाले. पण भारताचा स्वातंत्र लढा हा रक्त न सांडता, सहनशक्तीने, प्रेमाने, बंधुभावाने यशस्वी झाला. जगाने याचा वसा घेणे ही आजच्या काळाची गरज आहे.

महात्मा गांधींचा लढा जगाला व देशाला प्रेरणा देणारा आहे. आज भारतात विषमतेचे आणि महिलांना दुबळे करण्याचे वारे वाहत आहेत, तसेच दलितांचा व अल्पसंख्यांकाचा छळ सुरु आहे. जगाला व देशाला स्थैर्य, शांती व समृध्दी पाहिजे असेल तर देशाला गांधीजींच्या मार्गाने जावे लागेल. आज त्यांचा विरोध करणारे मनोमन त्यांच्या विचारांना मानतात. आज जगातील व देशातील वर्णदोष, जातीद्वेष, उच्चनिच्चता संपवायची असेल तर गांधीजींच्या मार्गाने जावे लागेल. तोच खरा न्यायाचा, नितीचा, खऱ्या मनुष्य धर्माचा आणि सुख शांतीचा मार्ग आहे. महात्मा गांधी आपल्या देशात जन्मले, वाढले आणि देशाला एकत्र करण्याचा प्रयत्न केला याचा आपल्याला सार्थ अभिमान असला पाहिजे. त्यांचे स्वप्न पुर्ण करणे आजच्या काळाची गरज आहे. आज त्यांचे विचार, आचार व त्यांची समत्व बुध्दी यांचे आचरण करण्याची प्रतिज्ञा आज आपण केली पाहिजे.

**संज्ञा :-**

व्यक्तीमत्व, पैलू, वर्तमान, प्रासंगिकता.

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी म्हणजे एक थोर व्यक्तीमत्व. ज्या इंग्रजांचे पुर्ण जगावर प्रभुत्व होते. त्या इंग्रजासोबत लढून भारताला स्वातंत्र मिळवुन देईपर्यंत शांत बसले नाहीत. स्वातंत्र्य पुर्व काळात भारतावर ब्रिटीशांची सत्ता होती. भारतीय संस्कृती आणि पाश्चिमात्य संस्कृती वेगळी होती. इंग्रज भारतीयांना गुलामाप्रमाणे वागणूक देत असत. भारतीयांचा अतोनात छळ केला जात असे. हा अन्याय, अत्याचार, गोर-गरीबांवर होतांना गांधीजींना वेदना होत असत. भारताला स्वातंत्र्य मिळवून देईपर्यंत ब्रिटीशांसोबत लढत होते. गांधीजी यांचा स्वभाव सुरवाती पासुनच शांत होता. अन्यायाविरुध्द लढावे असे त्यांना वाटे. गांधीजींचे शिक्षण झाल्यानंतर ते वकीली करण्यासाठी आफ्रिकेत गेले. तिथे त्यांनी पाहिले की, मानवाला गुलामाप्रमाणे वागणुक दिली जात आहे. त्या गुलामांना न्याय देण्यासाठी तिथे त्यांनी लढा दिला. तशीच वागणुक भारतात दिली जात होती. हे बघुन ते भारतात आले आणि अन्यायाविरुध्द लढायला सुरवात केली. गांधीजी हे अहिंसावादी सत्य



T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(M.S.)
134
Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28 , Vol. 2 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

SHIVAJI COLLEGE HINGOLI

बोलणारे, वेळेचे महत्व जाणणारे, सतत काम करणारे, स्वत:साठी लागणाऱ्या वस्तु, कापड, स्वयंपाक ते स्वत: करत. अन्यायाविरुध्द लढणे, जातीभेद दुर करणे, हिंसा बंद करणे, गुलामगिरी नष्ट करणे, खेडे स्वयंपुर्ण करणे. यासाठी ते आयुष्यभर लढले. त्यांच्या व्यक्तीमत्वात इतके पैलू होते की, ते मोजने शक्य नव्हते. कोणत्याही साच्यात टाकले तर ते बसत होते. त्यांनी अंगीकारलेले काही तत्वे अतिशय मौल्यवान आहे. त्यांच्या तत्वांची, आचरणाची, राहणीमानाची आजच्या तरुणांना गरज आहे. गांधीजींचे स्वप्न होते की, भारतातील सर्व खेडयांना स्वयंपुर्ण करावे. म्हणजे तरुणांना काम मिळेल आणि बेकारी कमी होईल. त्यांच्या स्वप्नातील भारत त्यांच्या हत्येमुळे अपुर्ण राहिला. त्यांचे कार्य आजच्या तरुणाने पुर्ण करणे गरजेचे आहे. तरच भारतातील बेकारी, व्यसनाधिनता, अत्याचार, भ्रष्टाचार, स्त्रियावरील अत्याचार कमी होईल. असे घडेल तेंव्हा तीच खरी श्रध्दांजली ठरेल.

उद्देश :-

1) महात्मा गांधी यांच्या व्यक्तीमत्वातील पैलूंचा अभ्यास करणे.

2) महात्मा गांधी यांच्या विचारांची आज समाजाला असलेली गरज अभ्यासणे.

गृहितके :-

1) महात्मा गांधी यांच्या व्यक्तीमत्वात दडलेल्या विविध पैलुंचा अभ्यास करणे.

2) महात्मा गांधी यांचे विचार समाजाला वरदान याचा अभ्यास करणे.

विषयाचे महत्व :-

महात्मा गांधी एक असे व्यक्तीमत्व होते की, ते जगाला हवे हवेसे वाटे. गांधीजी म्हणजे काल, आज आणि उदया असे व्यक्तीमत्व आहे. गांधीजींच्या विचाराने पुर्ण जगाला स्वातंत्र्य मिळवून दिले. आईनस्टाईन म्हणाले होते की, विसाव्या शतकाने जगाला दोन शक्ती दिल्या एक अनुबॉम्ब आणि दुसरी महात्मा गांधी. विस्टन चर्चिल हे आफ्रिकेचे गव्हर्नर जनरल स्टनस यांना म्हणाले की, 'तुझ्या तुरुंगात असतांना तू गांधीला मारले असते, तर आपले साम्राज्य आणखी काही शतके राहिले असते.' गांधी या निशस्त्र मानसाने हे सामर्थ्य कुठुन आणले. या वरून गांधीजींच्या सामार्थ्याची, विचारांची, कृतीची, कार्याची, वेळेची, आचरणाची किती गरज होती आणि आहे. भारतीय माणूस हा शस्त्र घेऊन लढू शकत नाही हे ओळखले. या महात्म्याने भारतीयांची सहनशक्ती हेच त्यांचे सामर्थ्य आहे हे ओळखले आणि त्यांच्या हाती अहिंसा व सत्याग्रह ही दोन हत्यारे दिली. गांधीजीच्या नेतृत्वात संघटीत झालेला भारत हा एकटाच स्वतंत्र झाला नाही तर अर्धेजगच स्वतंत्र झाले. गांधीजी हे कोण्या एका वर्णाचे, धर्माचे, देशाचे वा पंताचे नव्हते तर ते साऱ्यांचे होते.

महात्मा गांधींनी स्वातंत्र्य, बंधूता, समानता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, विज्ञान निष्ठा या सारखी मुल्ये प्रमाण मानत एकात्म भारताचे स्वप्न पाहीले होते. ते अद्याप अपूर्ण आहे. ते पूर्ण करण्यासाठी त्यांच्या व्यक्तीमत्वातील विविध पैलूंचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ते पुढील प्रमाणे

1) खेडे आणि गांधी :-

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारताचा विकास व्हायचा असेल तर अगोदर खेड्यांचा विकास झाला पाहिजे. म्हणून महात्मा गांधी म्हणत की खेड्याकडे चला. नुसती त्यांनी घोषणा केली नाही तर ते स्वत: नेहमी करीता खेड्यात राहीले, ज्या खेड्यात राहीले त्या खेड्याचे नाव आहे सेवाग्राम. याच गावात गांधीजी आले गावकऱ्यांच्या सोबत हितगुज केले. ते त्यांना म्हणाले की, तुमची सेवा हाच एक ध्यास आहे. पण तो मी तुमच्यावर लादणार नाही. तुम्हाला आणि समाजाला एकत्र जोडने, आपल्या प्रत्येक गावातील रस्ते, गल्या स्वच्छ होणे आवश्यक आहे. गावातील रोगराई दुर झाली पाहीजे. गावातील नष्ट होणारे पारंपारिक उद्योग, हस्तकला यांचे पुर्नरुज्जीवन करुन तुम्हाला स्वालंबी करण्याची इच्छा आहे. त्यासाठी तुमची मदत पाहीजे आणि गांधीजींनी सेवाग्रामला एक आदर्श गाव बनविले. याच प्रमाणे आज भारतातील प्रत्येक खेड्याने याचा आदर्श घेवून विकास करणे गरजेचे आहे.

2) गांधी आणि सर्वोदय :-

सर्वोदय पुस्तक हे गांधीजींनी लिहले आहे. गांधीवाद हा याच पुस्तकातुन समोर आले. या पुस्तकात समान काम समान वेतन असे लिहले. समाजात श्रमीक आणि बुध्दीजीवी असा भेदभाव न करण्याचे याच पुस्तकात आहे. पण असे विचार गांधीजीत येण्यासाठी त्यांनी जॉन रस्कीन लिखीत 'अन टू धिस लास्ट' हे पुस्तक वाचले आणि त्यांच्या विचारात अमुलाग्र बदल झाला. गांधीजींनी एवढे सांगून सुध्दा लोक भेदभाव करतात. कमी अधिक समजतात. गांधीजींच्या या विचारांची आज खरी गरज आहे. हा विचार अंगीकारल्या शिवाय समाजातील भेदभाव कमी होणार नाही.

3) बहुगुणी गांधी :-

प्रत्येकात अनेक कौशल्य उपजत असतात. ते आत्मसात करता आले पाहिजे. गांधीजी पण अनेक गोष्टीत निपुण होते. अनेक कामे करायला त्यांना आवडत असे. ते नामंकित वकील होते. पण ते जास्तीत जास्त खटले समोपचाराने सोडवित. चांगल्या पध्दतीने सुत कातने, कापड विणने, स्वयंपाक करणे आवडायचे. ते स्वालंबी होते. स्वत:चे काम स्वत:च करत. स्वत:च कपडे शिवणे, स्वत:च्या कपडयांचे कापड ते स्वत: विणत, स्वयंपाकासाठी लागणारे साहित्य स्वत: तयार करत होते, गांधीजी डाव्या आणि उजव्या हाताने लिहीत असत, स्वत:चे जोडे



T. C.
Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)
135
Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

SHIVAJI COLLEGE HINGOLI

स्वत: शिवत. असे अनेक कामे स्वत: करत. याचा धडा आजच्या तरुणाने घेतला तर तरुणातील व्यसनाधिनता, आळशीपणा दुर होईल. असेच स्वत:ची कामे स्वत: केली तर आजचा तरुण स्वावलंबी होईल. यामुळे बेकारी, आत्महत्या करण्याचे प्रमाण कमी होईल.

4) काटकसरी गांधी :-

गांधीजी काटकसर करायचे पण कंजुस नव्हते. प्रत्येकाने काटकसरी असावे, पण कंजूस नसावे. काटकसर ही अपव्यय टाळते. आजचा तरुण काटकसरीने वागला तर त्याला आयुष्यात कमी पडणार नाही. अपव्यय टाळणे म्हणजे बचत करणे होय. उदा. गांधीजी लिहत बसले होते. त्यांनी कोणाला तरी पाणी पिण्यासाठी मागितले. त्याने तांब्याभर पाणी दिले त्यातले अर्धे पाणी गांधीजींनी पिले आणि अर्धे पाणी तसेच ठेवले. ज्याने पाणी आणले त्याने उरलेले पाणी फेकले तर गांधीजी त्याला ओरडले. तो घाबरला काय झाले असे म्हणाला, तर गांधी म्हणाले अर्धे पाणी पुन्हा वापरता आले असते. असे गांधीजी काटकसरी. आजचा माणुस कितीतरी पाणी वाया घालवितो. यातून शिकले पाहिजे की, पाण्याचे महत्व किती आहे. तिसरे महायुध्द झाले तर ते पाण्यासाठी होवु शकते.

5) गांधीजींच्या पत्राचे पत्ते :-

गांधीजी त्यांच्या कार्यामुळे जगभर प्रसिध्द झाले. त्यांचे चाहते जगाच्या काना कोपऱ्यात होते. ते त्यांना कामानिमित्त पत्र लिहित असत. तर त्यावर पत्ता काय लिहावा असे वाटे. म्हणून मग ते लिहित महात्मा गांधी इंडिया. एका लेखकाने तर 'द किंग ऑफ इंडिया' देहली. तरी त्यांना मिळाले. एक पत्र असे ही आले होते की, 'दि ग्रेट अहिंसा नोबेल ऑफ इंडिया' एकाने तर पत्ता माहित नसल्यामुळे गांधीजींचे चित्रच पत्रावर चिटकवले आणि इंडिया लिहिले पत्र गांधीजींना मिळाले. यावरुन महात्मा गांधीजे कार्य किती महान होते. असे आपले गांधी विदेशात पण किती महान होते.

आणखी काही पैलु त्यांच्या व्यक्तीमत्वात होते ते पुढीलप्रमाणे-

परदेशात जावुन बॅरिस्टर झालेले गांधी, तडजोड करुन वाद मिटवणारे वकील. त्यांच्या वकीलीत वास्तव हेच सत्य होते. अशा वकिलाची भारताला गरज आहे. संघटित होणे, संघर्ष करणे, हक्क मिळविणे असे केले तरच आपण गुलामीतुन सुटू असे विचार गांधीजींचे होते. महात्मा गांधींनी सुरवातीला आफ्रिकेत आणि नंतर भारतात गुलामगिरी विरुध्द स्वातंत्र्याचे फुंकलेले रणशिंग हा एक त्यांच्या व्यक्तीमत्वातील पैलू होता. कोणत्याही स्वातंत्र्य आणि हक्कांची लढाई म्हणजे साम्राज्यवादी मनोवृत्तीचा विरोध असतो, नि गुलामीच्या मुक्तीसाठी केलेले ते दुर्बलांचे दिव्य असते असे गांधीचे विचार होते. विनोबाजी म्हणतात क्रांती आणि शांतीचे भव्य दर्शन म्हणजे महात्मा गांधी. वेळेचा सदउपयोग कसा करावा हे गांधीजीकडून विनोबाजी शिकले. उदा. एकदा विनोबाजी गांधीजींना भेटायला गेले. तेव्हा गांधीजी भाजी चिरत होते. हे बघून विनोबांना आश्चर्य वाटले. पुढे गांधीजी विनोबांना म्हणाले चिंता नको माझ्याजवळ दुसरा चाकु आहे. आपण भाजी चिरत-चिरत गप्पा करु. यातुन विनोबांनी क्रिया योगाची दिक्षा घेतली.

सारांश :-

गांधीजींच्या या साऱ्या अनुभवातुन आजच्या समाजाने, व्यक्तीने शिकण्यासारखे आहे. गांधीजी सारखा एखादा थोर पुरुष ज्याची ओळख संपूर्ण जगाला आहे. फक्त ओळखच नाही तर त्यांचे कार्य, आचार-विचार, शांती, सहकार्य, अहिंसा, सत्य, निडरपणा, वेळेचे महत्व, लगण, मेहनत, सहिष्णुता, कर्तव्यनिष्ठा या सर्व गोष्टी त्यांचे पैलू जगाने अनुभवले आणि उपभोगले. पण अशी महान मुर्ती आपल्याला लाभणे हे आपले भाग्य म्हणावे. यांच्या विचारांचा पुरेपुर उपयोग करण्याची आज प्रत्येकाची गरज आहे. आजच्या तरुणाने गांधीजींच्या विचारातील, व्यक्तीमत्वातील काही तत्वांचे जरी पालन केले तरी भारत जगाच्या अग्रभागी राहू शकतो.

संदर्भ ग्रंथ :-

1) डॉ. आर. एम. भिसे, 'वर्तमान परिस्थिती महात्मा गांधीच्या विचारांची आवश्यकता' प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2012
2) डॉ. न. म. जोशी, 'मोहनदास करमचंद गांधी' अनुबंध प्रकाशन, पुणे, 2014
3) थॉमस वेबर, 'गांधी प्रथम त्यास पाहता' राजहंस प्रकाशन, पुणे, 2015
4) www.mkgandhi.org
5) www.hindisamay.com

T. C.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq & Dist.Hingoli.(MS)



Scanned with CamScanner

136